**शासकीय सेवेतून (गट अ राजपत्रित) सेवानिवृत्त अधिकारी (ग्रेड पे ७६००/- पेक्षा कमी) यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्यासाठी अर्ज मागविणेबाबत जाहिरात**

**राज्य सेवा हक्क आयोग, पुणे महसुली विभाग, पुणे यांचे कार्यालय**
**३ रा मजला, छत्रपती शिवाजीनगर- घोल रोड क्षेत्रिय कार्यालय, पुणे म.न.पा.शिवाजीनगर पुणे -४११ ००४**

---

शासकीय सेवेतून (गट अ राजपत्रित) संवर्गीय सेवेमधून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्याची सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी नामिकासूची करण्याकरीता अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | संवर्ग | विवक्षित कामाचे स्वरुप | वय अर्हता व अनुभव | पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| १. | शासकीय सेवेतून (गट अ राजपत्रित) संवर्गीय शासनाच्या सेवेमधून सेवानिवृत्त झालेले अधिकारी (ग्रेड पे ७६००/- पेक्षा कमी) | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अनुषंगाने प्रशासकीय विभागांचे परीक्षण, वार्षिक अहवाल इ. | वयोमर्यादा:- ५८ ते ६३ वर्षे<br>उमेदवारास शासकीय / निमशासकीय सेवेतील वित्तीय प्रशासकीय कामाचा अनुभव असावा.<br>संगणक ज्ञान अवगत असावे. | १ |

**नियुक्तीच्या अटी व शर्ती :-**

१.सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण -२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७.१२.२०१६ अन्वये नमूद अटी व शर्तीच्या आधारे नियुक्ती करण्यात येईल. सदर शासन निर्णयानुसार मासिक परिश्रमिक व भत्ते निश्चित करण्यात येतील.

२.करार पध्दतीने आयोगामध्ये नियुक्त केलेल्या व्यक्तींना कोणतेही पदनाम असणार नाही व अर्जित, नैमित्तिक व वैद्यकिय रजा अनुज्ञेय असणार नाही.

३.नियुक्तीच्या कालावधीत विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी करारपध्दतीने नियुक्ती देण्यात आलेल्या व्यक्तीची असेल.

४. करार पद्धतीने नियुक्त करावयाच्या अधिकाऱ्यास पुणे महसूल विभागांतर्गत पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर तसेच मुंबई येथे प्रस्तावित कामाच्या आवश्यतेनुसार दौरे करावे लागतील.

५. करारपध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय / वित्तीय अधिकार नसतील. अशी व्यक्ती कोणत्याही शासकीय पत्र / आदेश यावर स्वाक्षरी करण्यास पात्र असणार नाही.

६. मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार आयोगाचा राहील.मुलाखतीचा दिनांक अर्जदारांना कळविण्यात येईल.

७. उपरोक्त अटी व शर्तीसोबतच सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १७.१२.२०१६ च्या शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी त्यांचे अर्ज, शारीरिक व मानसिक आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असल्याचे प्रमाणपत्र, आवश्यक त्या शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या प्रमाणपत्रासह ही **जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून दि. ७.३.२०२४ पर्यंत खाली नमूद पत्त्यावर सादर करावेत.**

**संपर्क :-** राज्य सेवा हक्क आयोग, पुणे महसुली विभाग, पुणे यांचे कार्यालय , ३ रा मजला, छत्रपती शिवाजीनगर- घोल रोड क्षेत्रिय कार्यालय, पुणे म.न.पा.शिवाजीनगर पुणे -४११ ००४.
दूरध्वनी :- (०२०) -२९९५०६६३.
ई-मेल :- crtspune@maharashtra.gov.in

(अनुराधा खानविलकर)
उप सचिव
राज्य लोकसेवा हक्क आयोग,
पुणे महसुली विभाग पुणे.

Scanned with OKEN Scanner

**नियुक्तीच्या अटी व शर्ती :-**

१.सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण -२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७.१२.२०१६ अन्वये नमूद अटी व शर्तीच्या आधारे नियुक्ती करण्यात येईल. सदर शासन निर्णयानुसार मासिक परिश्रमिक व भत्ते निश्चित करण्यात येतील.

२.करार पध्दतीने आयोगामध्ये नियुक्त केलेल्या व्यक्तींना कोणतेही पदनाम असणार नाही व अर्जित, नैमित्तिक व वैद्यकिय रजा अनुज्ञेय असणार नाही.

३.नियुक्तीच्या कालावधीत विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी करारपध्दतीने नियुक्ती देण्यात आलेल्या व्यक्तीची असेल.

४. करारपध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय / वित्तीय अधिकार नसतील. अशी व्यक्ती कोणत्याही शासकीय पत्र / आदेश यावर स्वाक्षरी करण्यास पात्र असणार नाही.

५. अर्जदार उप जिल्हाधिकारी/ वरिष्ठ लेखा अधिकारी/ सहायक संचालक (गट-अ) या पदावरुन सेवानिवृत्त झालेला असावा.

६. गट-अ (ग्रेड पे ७८००/- पेक्षा कमी) पदावरील प्रशासकीय /वित्तीय कामकाजाचा अनुभव व संगणक हाताळण्याचे पुरेशे ज्ञान असणे आवश्यक.

७. अर्जदाराचे वय ६३ वर्षापेक्षा अधिक नसावे.

८. आवश्यक अर्हता धारण करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी सोबतच्या विहित नमुन्यात अर्ज करावा.

९. अर्जदार शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा. तसचे तो निर्व्यसनी असावा.

१०. अर्जदाराविरुध्द कोणतीही विभागीय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नसावी अथवा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

११. अर्जदारांनी विहित दिनांकाच्या आत अर्ज सादर करावा. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार व कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही. तसेच नियुक्तीची प्रक्रिया कोणत्याही टप्प्यात रद्द करण्याचे अधिकार विभाग प्रमुख यांना राहतील.

१२. मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार आयोगाचा राहील. मुलाखतीचा दिनांक अर्जदारांना कळविण्यात येईल.

१३. करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त अधिकाऱ्यास राज्य लोकसेवा हक्क आयोग पुणे येथे काम करावे लागेल. तसेच प्रस्तावित कामाच्या आवश्यकतेनुसार पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर तसेच मुंबई येथे दौरे करावे लागतील.

१४. सदर नियुक्ती प्रथम एक वर्षाच्या कालावधीकरिता करण्यात येणार आहे. कामाची आवश्यकता असल्यास व कामकाज समाधानकारक असल्यास मुदतवाढ देण्याबाबतचा अधिकारी विभाग प्रमुखांना राहील.

Scanned with OKEN Scanner

१५. करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आल्यामुळे शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत / सामावून घेण्याबाबत वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकारी / हक्क नसेल.

१६. करार पध्दतीने नियुक्तीच्या कालावधीत नेमून दिलेली कामे पूर्ण करण्याची जबाबदारी राहील.

१७. नियुक्ती प्राधिकारी यांना कोणत्याही वेळी, आगाऊ सूचना न देता करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील. त्यासाठी कारणे देण्याचे नियुक्ती प्राधिकाऱ्यावर बंधनकारक राहणार नाही.

१८. करार पध्दतीने नियुक्तीच्या कालावधीत सोपवलेली कामे पार पाडण्यात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यवसायिक कामात गुंतता येणार नाही.

१९. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध जाहिर करणे आवश्यक राहील.

२०. करार पध्दतीच्या कालावधीत आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीवेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

२१. सोपविलेले कामकाजाच्या वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करण्यात येईल.

२२. करार पध्दतीने नियुक्तीच्या कालावधीत कामकाजा दरम्यान प्राप्त होणारी कागदपत्रे / माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे बंधनकारक राहील.

२३. उपरोक्त अटी व शर्तीसोबतच सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १७.१२.२०१६ च्या शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

-----------

Scanned with OKEN Scanner

# अर्जाचा नमुना

## करार पध्दतीने नियुक्तीसाठी अर्ज

(शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभग क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७.१२.२०१६)

अलीकडील
काळातील
स्वत:चे
छायाचित्र येथे

१) अर्जदाराचे संपूर्ण नांव :

२) अर्जदाचा पत्ता :

३) भ्रमणध्वनी क्रमांक :

४) ई-मेल आयडी :

५) सेवानिवृत्तीच्या वेळचे पदनाम :

६) सेवानिवृत्ती दिनांक :

७) शैक्षणिक अर्हता :

८) अनुभव :

| अ.क्र. | काम केलेल्या विभागांची नावे | कालावधी | कामाचे स्वरुप / विषय |
|---|---|---|---|
| | | | |

(जाहिरातीमध्ये नमूद केलेले पद) या पदावर करार पध्दतीने नियुक्ती बाबतची जाहिरात / अटी व शर्ती मी काळजीपूर्वक वाचल्या असून करार पध्दतीने नियुक्तीबाबतच्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

मी प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो/करते की, वरील सर्व माहिती सत्य असून सदर माहिती चुकीची आढळून आल्यास होणाऱ्या कार्यवाईस मी जबाबदार राहीन याची मला जाणीव आहे.

(अर्जदाराचे नाव व सही)

Scanned with OKEN Scanner